

शब्दांचा अवकाश

जयंत नारळीकर

jayant@iucaa.ernet.in

# समारंभशूरा: खलु भारतीया:।

समारंभ कुठलाही असो; वेळेचं नियोजन आपल्याकडं क्वचितच आढळेल. आपल्याकडं बहुतेक समारंभ सुरू होतात ते नियोजित वेळ टळून गेल्यावरच...वर वक्त्यांचीही भरमसाट गर्दी. त्यात पुन्हा कुणी काय आणि किती बोलावं, याही तारतम्याचा अभाव...अशा वातावरणात मुख्य वक्त्याचा हिरमोड व्याख्यान सुरू करण्याआधीच झाल्यास नवल ते काय?



रॉयल इन्स्टिट्यूशनमधलं शुक्रवार सायंकाळचं व्याख्यान. १९०४ मधलं. तिथं आजही असंच व्याख्यान आयोजित केलं जातं. (चित्रकार : हेन्री जेमिन ब्रुक्स)

भारतातले गणिती आणि खगोलविद भास्कराचार्य यांचा ९०० वा जन्मदिन या वर्षी जानेवारीत साजरा करण्यात आला. त्यांचा जन्म कुठं झाला, याबद्दल तज्ज्ञांमध्ये एकमत नाही; पण जन्मवर्षाबद्दल एकमत आहे. चाळीसगावजवळ पाटण या खेड्यात त्यांचा जन्म झाला, असा एक मतप्रवाह असल्यानं उत्तर महाराष्ट्रात हा दिवस साजरा केला गेला. त्यानिमित्त एका परिसंवादात भाग घेण्यासाठी मी गेलो होतो.

भास्कराचार्यांचं कार्य बाराव्या शतकातलं. गणित आणि खागोलशास्त्रात असामान्य समजलं जाणारं. त्यांच्या कार्याची माहिती देणारा परिसंवाद

चार-पाच तास सहज चालला असता. तरीपण साधारणतः दोन तास चालेल, अशा नियोजित परिसंवादात A, B, C हे तीन वक्ते संबंधित विषयांवर बोलणार होते. त्यापैकी वक्ता A भास्कराचार्यांच्या एकूण जीवनाचा आढावा घेणार होता, तर B आणि C हे वक्ते खगोलविज्ञान आणि गणित या क्षेत्रांतलं त्यांचं कर्तृत्व सांगणार होते.

सकाळी १० ला सुरू होऊन हा कार्यक्रम दुपारी १२ पर्यंत संपावा, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात वेगळंच घडायचं होतं! सुरवात उशिरा म्हणजे साडेदहाला झाली. कारण, काही VIP नेहमीप्रमाणे उशिरा आले; पण उशिरा सुटलेली रेल्वेगाडी सिग्नलसाठी थांबत थांबत जाते, तशी परिसंवादाची गाडी रमतगमत चालली. प्रथम अनेक मान्यवरांचा अनेक मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला! नंतर परिसंवादाचं आयोजन करणाऱ्या संस्थेचा अहवाल वाचण्यात आला. मग तिघा वक्त्यांचे सत्कार आणि त्यांच्याबद्दल सविस्तर माहितीचं वाचन आदी सोपस्कारांत घड्याळ बाराची वेळ दाखवू लागलं. बिचारे भास्कराचार्य नऊ शतकं थांबले; त्यात त्यांनी आणखी दोन तास थांबायला काय हरकत होती? पण श्रोत्यांचे कंटाळलेले चेहरे आणि चुळबूळ पाहून A, B आणि C यांनी आपलं नियोजित भाषण कमी कसं करता येईल, याचा विचार मनातल्या मनात आरंभला.

वक्ता A पुष्कळ तयारीनिशी आलेला होता. भास्कराचार्यांबद्दल माहितीपूर्ण पुस्तक त्यानं लिहिलेलं असल्यानं जमलेल्या सर्वसामान्यांना रुचेल आणि पचेल अशी मनोरंजक माहिती त्याच्याकडं होती; पण या कापाकापीत ती त्याला सांगता आली नाही.



सन १८३८ मधलं लंडनचं रॉयल इन्स्टिट्यूशन. (चित्रकार : थॉमस शेफर्ड)

परिसंवादात वेळेचं नियोजन अभावानंच झालेलं होतं, याची जाणीव आयोजकांना करून देण्याबाबत मला राहवलंच नाही. मी माझ्या भाषणात म्हटलं : ''अशा परिसंवादात A सारख्या वक्त्याला इतक्या उशिरा बोलायला सांगणं म्हणजे सचिन तेंडुलकरला आठव्या स्थानावर बॅटिंग करायला पाठवण्यासारखं आहे.''

हे परिसंवादाचं वर्णन आपल्या बहुतेक समारंभांना लागू पडतं. जर A चं भाषण असेल, तर त्याला अध्यक्ष B लागतो; तसंच A बद्दलची माहिती सांगणारा C पाहिजेच. C च्या बोलण्याची सुरवात 'A हे इतके प्रसिद्ध आहेत, की त्यांची माहिती सांगायची गरज नाही...'' अशी असली तरीही तो सविस्तर माहिती (तीन-चार चुकांसकट!) सांगणारच. मात्र, आयोजकांना केवळ तीन वक्त्यांवर भागवणं बरं वाटत नाही म्हणून 'गेस्ट ऑफ ऑनर' या सदराखाली आणखी तीन-चार लोकांना व्यासपीठावर बसवलं जातं. अर्थात त्यांची भाषणं व त्यांची माहिती करून देणाऱ्यांची भाषणं पाठोपाठ येणारच. याशिवाय एखाद्या पुस्तकाचं किंवा स्मरणिकेचं प्रकाशन होणार असलं, तर त्यासाठी एक महाभाग पाहिजेच आणि शेवटी आभारप्रदर्शन करणारा दळण दळायला तयार असतोच! असं झालं तरच आयोजकांना कृतकृत्य वाटतं आणि समारंभ तीन तास चालणार, याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर झळकतं!

अशा वेळकाढू समारंभांना न गेल्यानं मला विधायक कार्यासाठी वेळ मिळतो, ही मला जमेची गोष्ट वाटते. अशा बहुतेक समारंभांना नकार देऊन मला माझ्या लेखन-वाचन-संशोधनासाठी वेळेचा जो बोनस मिळतो, तो अंदाजे आठवड्यात दहा तास तरी असावा! पण मुळात वेळकाढू नसलेले, आटोपशीर समारंभ असतात का? लंडन इथल्या 'रॉयल इन्स्टिट्यूशन'तर्फे आयोजित 'शुक्रवार संध्याकाळची भाषणं' हे एक उदाहरण. ही व्याख्यानमाला १९ व्या शतकात मायकेल फॅरडे या शास्त्रज्ञाच्या कारकीर्दीपासून सुरू आहे. मला या मालिकेत भाषण करायचा मान लाभला होता. त्या वेळी वेळ पाळण्यासंदर्भात मी तिथं जे काही अनुभवलं, ते आता पुढं सांगत आहे.

व्याख्यानाची वेळ शुक्रवारी रात्री ९ ते १०. तत्पूर्वी, व्याख्यात्याला जेवायचं सपत्नीक आमंत्रण येतं. काळा डिनर सुट घालून यायची सूचना, ही डिनर दर्जेदार असल्याची ग्वाही देते. डिनरनंतर निमंत्रक संस्थेचे संचालक पाहुण्यांना संस्थेचा मुख्य भाग फिरून दाखवतात आणि वक्त्याला प्रेक्षागृहाजवळ एका लहानशा खोलीत आणून सोडतात. तिथं वक्त्याला भाषणावर चिंतन करायला पाच-दहा मिनिटं मिळावीत म्हणून ही तजवीज. या खोलीचं आणखी एक 'माहात्म्य' पुढं कळेल!

बरोबर ९ वाजता वक्ता प्रेक्षागृहात प्रवेश करतो. वक्त्याबद्दलची छापलेली माहिती प्रवेशिकेसमवेतच दिली जात असल्यानं ती श्रोत्यांपर्यंत आधीच पोचलेली असते. त्यामुळं ती पुन्हा सांगण्याची गरज नसते. वक्त्यानंही यजमानांना धन्यवाद वगैरे न देता व्याख्यान द्यायला सुरवात करायची असते आणि सर्वात कठीण गोष्ट म्हणजे प्रेक्षागृहात समोरच लावण्यात आलेल्या घड्याळात दहाचे ठोके पडताच व्याख्यानाची सांगता झाली पाहिजे! ही कसरत आपल्याला जमेल का, याची काळजी वक्त्यांना नर्व्हस करते. एकदा व्याख्यानापूर्वी मनन करायला बसवलेला वक्ता खोली सोडून पसार झाला. त्या प्रसंगी फॅरडेनं स्वतः त्या रात्रीचं भाषण केलं. तेव्हापासून वक्ता त्या खोलीत गेला, की तिचं दार कुलूप लावून बंद करतात!

व्याख्यानानंतर रिसेप्शन असतं. तिथं श्रोते वक्त्याशी संवाद साधू शकतात, त्याला प्रश्न विचारू शकतात.

यापैकी आपण आवर्जून दखल घ्यायला हवी, ती या दोन गोष्टींची : १) व्याख्यानाची गाडी वेळेवर चालते, २) व्याख्यानाच्या कार्यक्रमात वेळेचं काटेकोर नियोजन असतं.

वेळेच्या नियोजनाचा हा काटेकोर आदर्श घेण्याबाबत भारतात यशस्वी प्रयत्न केला तो होमी भाभा यांनी. टाटा इन्स्टिट्यूटमध्ये जाहीर व्याख्यानांत अध्यक्षांनी वक्त्याचे आभार सुरवातीलाच मानण्याचा प्रघात त्यांनी सुरू केला. त्या वेळी व्यासपीठार दोनच व्यक्ती. अध्यक्ष आणि वक्ता ! लंडनच्या रॉयल इन्स्टिट्यूटशनमध्ये तर व्यासपीठावर असते एकच व्यक्ती. केवळ वक्ता !!